# आपत्तीला सामोरे जाताना...

## सावंतवाडीत रंगीत तालीम; पोलिस विभागाच्या आपत्ती व्यवस्थापनाचा पुढाकार

सकाळ वृत्तसेवा

सावंतवाडी, ता. २६ : पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी येथील पोलिस ठाण्याच्या आपत्कालीन विभागाकडून आज सकाळी मोती तलावामध्ये रंगीत तालीम राबविण्यात आली. आपत्कालीन विभागाकडे असलेल्या बोटींच्या साहाय्याने तलावामध्ये प्रात्यक्षिके घेण्यात आली; मात्र भरदुपारी तलावात शोध मोहीम कसली? अशी चर्चा नागरिकांत सुरू झाली; मात्र ती रंगीत तालीम असल्याचे समजल्यावर सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला.



सावंतवाडी : मोती तलावात येथील पोलिसांकडून राबविलेली रंगीत तालीम. (छायाचित्र : रूपेश हिराप)

येथील मोती तलावात आज दुपारी पोलिस विभागाच्या आपत्ती व्यवस्थापन टीमने प्रात्यक्षिक सादर केले. अचानक उद्‌भवणारे चक्रीवादळ अथवा मुसळधार पाऊस वा अन्य आपत्ती आल्यास प्रशासन सज्ज असल्याची यावेळी चाचपणी करण्यात आली. ही रंगीत तालीम असली तरीही आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे कोणत्या सुविधा आहेत की नाहीत याची खातरजमा या निमित्ताने करण्यात आली. कोण किती वेळात पाण्यात उडी मारून लोकांचे जीव वाचवू शकतो, याची ही तालीम करण्यात आली.

मोती तलावाबरोबरच मळगाव घाटीतही पोलिसांच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या टीमने रंगीत तालीम व प्रात्यक्षिके केली. एकूणच येणाऱ्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कोणतीही आपत्ती उद्‌भवल्यास प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन सज्ज असल्याचे यावेळी निदर्शनास आले.

### यांचा सहभाग

या रंगीत तालीममध्ये सावंतवाडी पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक फुलचंद मेंगाडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वाती यादव, आनंद यशवंते, हवालदार सतोश कविटकर, चंद्रकात प्रभू खानोलकर, देवदत्त कांडरकर, सुनील नाईक, प्रसाद कदम, रामचंद्र सातेलकर, प्रवीण सापळे, गुरु भागवत आदींसह होमगार्ड व पालिका कर्मचारी सहभागी झाले.